**ठळक बातम्या**

- भारतीय वायूसेनेचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला पुढच्या महिन्यात आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणार

- छत्तीसगडमधल्या सुकमा जिल्ह्यात आज २२ नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण

- दोन हजार रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या युपीआय व्यवहारांवर जीएसटी लावण्याचा कुठलाही विचार नसल्याचं सरकारचं स्पष्टीकरण

**आणि**

- जेईई मेन ची उत्तरसूची जारी, उद्या निकाल जाहीर होणार

**<><><><><><>**

आंतरराष्ट्रीय अंतराळ मोहिमेचा भाग म्हणून भारतीय वायूसेनेचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला पुढच्या महिन्यात आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणार आहेत. ॲक्सिओम स्पेसच्या ए एक्स-४ या अंतराळ मोहिमेची सर्व तयारी झाली असल्याची माहिती इस्रोचे अध्यक्ष डॉ. व्ही. नारायणन यांनी दिली आहे. या मोहिमेद्वारे भारत आपल्या अंतराळ क्षेत्रात एक निर्णायक अध्याय लिहिण्याठी सज्ज असल्याचं अवकाश आणि अणुऊर्जा राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी म्हटलं आहे. येत्या काही महिन्यांतल्या इस्रोच्या योजनांचा आढावा घेण्यासाठी नवी दिल्लीत झालेल्या उच्चस्तरीय बैठकीनंतर ते बोलत होते. आंतरराष्ट्रीय भागीदारांसोबतचे सहकार्य आणि गगनयान सारख्या प्रकल्पांची धोरणात्मक गती अंतराळ तंत्रज्ञानात जागतिक नेता बनण्याच्या भारताच्या वचनबद्धतेचं प्रतिबिंब असल्याचं त्यांनी म्हटलं.

**<><><><><><>**

सागर परिक्रमा मोहिमेवर असलेल्या नौदलाच्या महिला अधिकाऱ्यांनी जगातील सर्वात आव्हानात्मक सागरी मार्गांपैकी एक केप ऑफ गुड होप पार केला आहे. भारतीय नौदलाच्या लेफ्टनंट कमांडर दिलना के आणि लेफ्टनंट कमांडर रूपा ए या आयएनएसव्ही तारिणी जहाजातून जगाची प्रदक्षिणा घालणारी विश्व सागर परिक्रमा पूर्ण केल्यानंतर परतीच्या प्रवासाला निघाल्या आहेत. जोरदार वारे, उंच लाटा यासाठी प्रसिद्ध असलेले केप ऑफ गुड होप त्यांच्या प्रवासात एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारतीय नौदलाने ही या मोहिमेतली एक मोठी कामगिरी असल्याचं म्हटलं आहे.

**<><><><><>**

२०३० पर्यंत देशातून होणारी निर्यात ५० हजार कोटींपर्यंत पोहोचेल, असा विश्वास संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी व्यक्त केला आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं चेम्बर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज ॲण्ड ॲग्रीकल्चर- सीएमआयएच्या 'मराठवाडा-आत्मनिर्भर भारत की रक्षाभूमि' या संवाद सत्रात बोलत होते.

राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या कार्यकाळात निर्यातीत चाळीस पटीने वाढ झाल्याकडे संरक्षणमंत्र्यांनी लक्ष वेधलं. २०१४ मध्ये भारतातून होणारी निर्यात सुमारे सहाशे कोटी एवढी होती, ती आता २४ हजार कोटींवर गेल्याची माहिती राजनाथसिंह यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलतांना, दहा हजार एकरावर उभारलेल्या दिल्ली मुंबई इंडस्ट्रीयल कॉरीडॉर-डीएमआयसी प्रकल्पाच्या विस्तारासाठी आणखी आठ हजार एकर जमीन संपादित केली जाणार असल्याचं सांगितलं. सीएमआयएच्या उद्योजकांमध्ये सामुहिक विकासाची भावना दिसून येत असल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी समाधान व्यक्त केलं.

**<><><><><>**

छत्तीसगडमधल्या सुकमा जिल्ह्यात आज २२ नक्षलवाद्यांनी वरिष्ठ पोलिस अधिकारी आणि केंद्रीय सुरक्षा राखीव दलासमोर आत्मसमर्पण केलं. यात नऊ महिला नक्षलवाद्यांचा समावेश आहे. सुकमाच्या बडेसेट्टी पंचायतमध्ये अनेक नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले असून पंचायत पूर्णपणे नक्षलमुक्त झाली असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण करून मुख्य प्रवाहात सामील होण्याचं आवाहन त्यांनी केलं आहे. राज्य सरकारच्या पुनर्वसन धोरणानुसार या सर्व नक्षलवाद्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहन निधी दिला जाणार आहे.

**<><><><><>**

दोन हजार रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या युपीआय व्यवहारांवर जीएसटी लावण्याचा सरकारचा विचार नसून हे दावे खोटे आणि दिशाभूल करणारे आहेत. सध्या सरकारसमोर असा कोणताही प्रस्ताव नाही. युपीआय व्यवहारांवर सध्या कोणताही व्यापारी सवलत दर आकारला जात नाही. त्यामुळे या व्यवहारांवर जीएसटी लागू होत नाही.

**<><><><><>**

केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी येत्या १ ते ४ मे दरम्यान मुंबईत होणाऱ्या वेव्हज परिषदेच्या तयारीचा आज आढावा घेतला. मुंबईत वांद्रे कुर्ला संकुलातल्या जिओ वर्ल्ड सेंटरचा विस्तृत दौरा केल्यानंतर त्यांनी या संदर्भात सहभागी असलेल्या विविध विभागांच्या प्रमुखांची एक बैठकही घेतली.

**<><><><><>**

वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अँड एंटरटेनमेंट समिट (वेव्हज) अंतर्गत एक प्रमुख उपक्रम म्हणून सुरू झालेल्या क्रिएट इन इंडिया चॅलेंजची अंतिम फेरी येत्या १ ते ४ मे दरम्यान मुंबईत जिओ वर्ल्ड सेंटर इथं होणार आहे. यात १ लाख आशय निर्मात्यांनी नोंदणी केली असून त्यात १ हजार १०० पेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय

स्पर्धकांचा समावेश आहे. ॲनिमेशन   , कॉमिक्स, एआय, एक्सआर, गेमिंग, संगीत, व्हिडीओ अशा विविध क्षेत्रातल्या या स्पर्धकांना आपलं कौशल्य आजमावण्याची संधी यात मिळणार आहे. अंतिम फेरीत विजयी ठरलेल्यांना दुसऱ्या दिवशी वेव्हज क्रिएटर पुरस्कार प्रदान केले जातील.

**<><><><><>**

केंद्र सरकारने आज विविध मंत्रालये आणि खात्यांसाठी सचिवांची नियुक्ती केली आहे. अरविंद श्रीवास्तव यांची अर्थ मंत्रालयातले महसूल विभागाचे सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली. श्रीवास्तव सध्या प्रधानमंत्री कार्यालयात अतिरिक्त सचिव म्हणून कार्यरत आहेत. तर संरक्षण मंत्रालयातील महासंचालक, अधिग्रहण समीर कुमार सिन्हा यांना नागरी विमान वाहतूक सचिव म्हणून नियुक्त केले आहे. सध्या परराष्ट्र व्यापार महासंचालक म्हणून कार्यरत असलेले संतोष कुमार सारंगी यांची नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयात सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. निकुंज बिहारी ढाल यांना संसदीय कामकाज मंत्रालय सचिव म्हणून नियुक्त करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

राष्ट्रीय चाचणी संस्थेनं आज जेईई मेन २०२५ सत्र-२ ची अंतिम उत्तरसूची अधिकृतपणे जारी केली.  परीक्षा दिलेले उमेदवार उत्तरसूची अधिकृत वेबसाइट jeemain.nta.nic.in वर पाहू शकतात. जेईई मेन सत्र-2 चा निकाल उद्या जाहीर केला जाईल, अशी माहिती एनटीएनं दिली आहे. जेईई मेन्स २०२५ सत्र-२ ची परीक्षा २ ते ९ एप्रिलदरम्यान घेण्यात आली होती.

**<><><><><>**

भारतीय मुलींनी १४ व्या युरोपियन गर्ल्स मॅथेमॅटिकल ऑलिंपियाड स्पर्धेत २ रौप्य आणि २ कांस्य पदकं पटकावली. रौप्य पदक विजेत्या विद्यार्थिनींमध्ये केरळच्या संजना चाकोसह मुंबईच्या श्रेया मुंदडाचा समावेश असून कांस्य पदक

विजेत्या विद्यार्थिनींमध्ये पुण्याच्या सई पाटीलचा तसंच कोलकताच्या श्रेया रे हिचा समावेश आहे. कोसोवोची राजधानी प्रिस्टिनामध्ये ११ ते १७ एप्रिल दरम्यान ही स्पर्धा झाली. भारतानं पहिल्यांदाच या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या प्रतिनिधी डॉ. मृदुल थत्ते तसंच चेन्नई गणितीय संस्थेच्या प्रतिनिधी अदिती मुधखोड आणि अनन्या रानडे यांनी या तुकडीचं नेतृत्व केलं.

**<><><><><>**

युनेस्कोच्या **मेमरी ऑफ द वर्ल्ड रजिस्टर**मध्ये भगवत् गीता आणि भरतमुनींच्या नाट्यशास्त्राचा समावेश केल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आनंद व्यक्त केला आहे. भगवत् गीता आणि नाट्यशास्त्राने शतकानुशतके संस्कृती आणि चेतना जोपासली असून त्यांचा समावेशामुळे जगाला प्रेरणा मिळेल, असं त्यांनी समाजमाध्यमावर एका पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

भारतीय जनता पक्षाचे राज्यभरात दीड कोटींहून जास्त प्राथमिक सदस्य असून १ लाख ३४ लाखांहून अधिक सक्रिय सदस्य असल्याची माहिती पक्षाचे राष्ट्रीय महासचिव अरुण सिंह यांनी दिली आहे. मुंबईत आयोजित वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. राज्यात भाजपच्या ७० टक्के बूथ समिती स्थापन झाल्या असून येत्या २२ एप्रिलपर्यंत १ लाख बूथ समिती स्थापन करण्याचं लक्ष्य असल्याचंही सिंह यांनी सांगितलं.

**<><><><><>**

जॉर्डन मधल्या आम्मान इथं सुरु असलेल्या मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धेच्या १५ तसंच १७ वर्षाखालच्या गटात खेळण्यासाठी भारतानं ५६ जणांची निवड केली आहे. निवड झालेल्या खेळाडूंमध्ये २०२४ दरम्यान झालेल्या आशियाई जुनिअर अजिंक्यपद स्पर्धेत रौप्य पदक पटकावणाऱ्या साहिल दुहानचा, कांस्य

पदक पटकावणाऱ्या देवांशचा तसंच स्कूल गेम्स फेडेरेशन ऑफ इंडियानं २०२४ दरम्यान आयोजित केलेल्या स्पर्धांमध्ये सुवर्ण पदक पटकावणाऱ्या टिकम सिंहचा समावेश आहे.

**<><><><><><>**

भालाफेकपटू नीरज चोप्रानं २०२५ च्या मैदानी हंगामाची शानदार सुरुवात केली आहे. दक्षिण आफ्रिकेतल्या एन डब्ल्यू यू पॉच इनव्हिटेशनल स्पर्धेत नीरजने ८४ मीटर ५२ सेंटीमीटर भालाफेक करत सुवर्णपदक पटकावलं.

//<><><><><><>//